# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ६४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०६/१०/२०१६

**१) विद्युत करंट लागल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०५/१०/२०१६ रोजी १७.०० वा. दर यातील मृतक दशरथ सदाशिव शिवनकर वय ५८ वर्ष, रा. पळसगाव हा आपल्या शेतातील बांधीतील धानाला बोअरवेलने पाणी देतो म्हणुन शेतात गेला असता शेत बांधीतील विद्युत पोलला लावलेली विद्युत मिटर पेटीला करंट लागुन तो जागीच मरण पावला असे फिर्यादी विनय दशरथ शिवनकर वय ३५ वर्ष, रा. पळसगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे. साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहे.

**२) उपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु . :–**

दिंनाक. ०४/१०/२०१६ रोजी १८.२० वा. दर यातील मृतक सौ. सविता रामलाल नेवारे वय ३२ वर्ष रा. कवलेवाडा यांचे कुटंब नियोजन ऑपरेशन दिनांक २९/०९/२०१६ ला प्राथमिक आरोग्य केन्द्र धारगाव येथे झाले होते त्या दरम्यान तिचाी प्रकृती दि. ३०/०९/२०१६ ला जास्त बिघडल्यामुळे डॉ. नी सामान्य रुग्णालय भंडारा येथे रेफर केले होते. तेथील डॉक्टरनी उपचार करुन प्रकृती जास्त खराब असल्याने पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केले असता उपचारा दरम्यान दि. ०४/१०/२०१६ ला १८.०० वा दर. मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पोस्टे कारधा ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडापे यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०५/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.